चर्चा : २

# श्री. सोवनींच्या शंकाकुशंका : एक उत्तर

मे १९९७ च्या 'परामर्श'च्या अंकातील श्री. शरद सोवनी यांचा 'गीता तत्त्वज्ञान : काही प्रश्न' या नावाचा लेख वाचला. लेखाच्या शेवटी 'लेख दुराग्रहातून लिहिलेला नसून केवळ गीतेचे परिशीलन करून तिच्यातील विसंगती व भ्रामक कल्पना बाजूस सारून मनुष्यजातीस मार्गदर्शक असलेले गीतेतील ज्ञान शोधण्यासाठी' लेख लिहिला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले असले तरी त्यांनी गीता, गीतेचे तत्त्वज्ञान व भगवान श्रीकृष्णाविषयी पूर्वग्रहदूषिततेतूनच लिहिले असल्याचे लेखातील प्रत्येक परिच्छेदातून स्पष्ट होते. या तिहींविषयी नको त्या शंका-कुशंका उपस्थित केलेल्या आहेत.

गीतेतील 'अर्जुनविषाद'योग नावाच्या पहिल्या अध्यायातील पांडव-पक्षाकडील वीरांनी कोणकोणते शंख वाजविले या घटनेचे वर्णन करणाऱ्या श्लोकांमध्ये कोणते मार्गदर्शक ज्ञान आले आहे ? असा प्रश्न ते करतात. परंतु या श्लोकांचा विचार करताना श्री. सोवनी यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, गीता हा व्यासकृत 'महाभारत' नावाच्या महाकाव्याचा एक छोटासा भाग आहे. या काव्यामध्ये कौरव व पांडवांची चरित्रे व त्यांच्या गुणावगुणांचे वर्णन केलेले आहे. तसेच महाभारतयुद्धप्रसंगी श्रीकृष्णाने अर्जुनास गीता सांगितली असल्याने युद्धाची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे म्हणून वरील श्लोक महत्त्वाचे आहेत.

भीष्म हे कौरवांचे सेनापती. त्यांनी सेनापती या नात्याने प्रथम शंख वाजविला व त्यानंतर कौरव पक्षीयांकडील इतर वीरांनी शंखनाद केले. यावरून कौरव सैन्यामध्ये केवळ औपचारिकता होती. आत्मीयता नव्हती. यामुळेच कौरवसेनेमध्ये अठरा दिवस चाललेल्या महाभारतयुद्धामध्ये सेनापती, सारथी कोण होणार ? यावरून अनेक अंतर्गत वादविवाद व वाग्युद्धे झाली. तसेच कौरवसेनेतील प्रमुख वीरांचे परस्परांशी सख्य नव्हते. पहिले दहा दिवस भीष्म सेनापती असताना कर्ण युद्धात मुळी लढतच नाही. कर्णाचे सारथ्य स्वीकारण्याअगोदरच कर्ण व शल्यामध्ये वादावादी झाली आहे. या दोन प्रसंगावरून कौरवसेनेत औपचारिकता

असली तरी त्यांच्यात आत्मीयतेचा अभाव होता ही गोष्ट सिद्ध होते. या उलट पांडवसेनेमध्ये औपचारिकतेपेक्षा आत्मीयता अधिक होती. श्रीकृष्णाने केवळ अर्जुनावरील प्रेमाने त्याचे सारथ्य स्वीकारले व त्यात त्याला कमीपणा वाटत नाही. शल्यास मात्र कर्णाचे सारथ्य स्वीकारताना अपमान वाटतो. म्हणूनच, श्रीकृष्णानंतर पाच पांडवांनी, शिखंडीने व त्यानंतर पांडवसेनेच्या सेनापतीने म्हणजे धृष्टद्युम्नाने शंख वाजविला. सेनापत्य व सारथ्य या बाबतीतही पांडवांकडील वीरांमध्ये वादावादी झाल्याचे महाभारतात वर्णन नाही.

गीता हा मोक्षप्रद ग्रंथ असल्याने गीतेच्या अध्ययनाने कोणाला मोक्ष मिळाला का ? असा प्रश्न करून तसे कोणी सांगत नसल्याने गीतेचा व मोक्षाचा संबंध नाही असे श्री. सोवनी ठरवतात व गीतेच्या अध्ययनाने कोणास मोक्ष मिळाल्यास मोक्ष म्हणजे नेमके काय ? असा प्रश्नही ते विचारतात. 'मोक्षा'ची संकल्पना जाणून घेण्यासाठी मी श्री. सोवनी यांना लोकमान्य टिळक, श्री. अरविंद, महात्मा गांधी व विनोबा भावे या गीतेच्या अभ्यासकांचे ग्रंथ मुळातून वाचण्याची सूचना करतो. तसेच महाभारतातील शांतिपर्वाच्या तिसऱ्या 'मोक्षधर्म'पर्व नावाच्या उपपर्वाचाही श्री. सोवनी यांनी अभ्यास केल्यास त्यांचे मोक्षाविषयीचे अपसमज दूर होतील. 'मोक्षधर्म' पर्वामध्ये व्यासांनी अनेक व्यवहारातील उदाहरणांच्या सहाय्याने मोक्षावस्था समजावून सांगितली आहे. 'मोक्षा'मध्ये मानसिक विकास, भावनिक परिपक्वता, समत्त्ववृत्ती इ.. गोष्टी अपेक्षित आहेत. गीतेच्या अध्ययनाने व्यक्तीचा मानसिक विकास होऊन व्यक्तीमध्ये बुद्धीची स्थिरता, भावनिक परिपक्वता, सदसद्विवेकबुद्धी व कर्तव्यनिष्ठा हे गुण विकसित होतात, हे लोकमान्य टिळकांचे चरित्र वाचल्यास लक्षात येते. गीतेच्या अध्ययनाने व्यक्तीमध्ये कर्तव्यनिष्ठा व पराकोटीची समर्पणवृत्तीही विकसित होते. भारतीय स्वातंत्र्य-लढ्यातील क्रांतिकारकांना गीतेतूनच प्रेरणा मिळाली आहे. गीतेचे श्लोक म्हणत कित्येक क्रान्तिकारक फासावर चढले. यावरून गीतेच्या तत्त्वज्ञानामध्ये सर्वसामान्यांना व क्रान्तिकारकांना कर्तव्यप्रेरित करण्याचे सामर्थ्य आहे. असे असले तरी गीतेच्या अध्ययनाने 'मला मोक्ष मिळाला' असे सांगणारा श्री. सोवनी यांना कोणी भेटला नसल्याचे ते म्हणतात याला काय म्हणावे ?

'एवढी हत्या करूनही त्याचे पाप अर्जुनाला लागले नाही असे गीता सांगते तर इतरांना मात्र त्यांच्या लहान-सहान चुकांचेही पाप लागते ते कसे ?' असा

श्री. सोवनी यांचा प्रश्न आहे. परतुं हा प्रश्न करण्याअगोदर त्यांनी हे ही लक्षात घ्यावयास हवे होते की, अर्जुन हा क्षत्रिय होता. युद्धात त्याने अधर्माचरण करणाऱ्यांना मारले आहे. (आजही युद्धामध्ये सैनिकाने शत्रुपक्षाकडील लोकांना मारले तर त्यास त्याचे पाप लागत नाही.) वास्तविकतः कुरुक्षेत्रावरील झालेल्या युद्धात दोहोंपक्षाकडील वीर मारले गेले आहेत. या नरसंहारास केवळ धृतराष्ट्र व दुर्योधन जबाबदार आहेत. द्यूतात हरल्याने व म्हणून ठरल्याप्रमाणे बारा वर्षे वनवास व एक वर्षे अज्ञातवास संपवून पांडव इंद्रप्रस्थाचे राज्य मागत होते. (हस्तिनापूरचे नव्हे !) इंद्रप्रस्थाचे राज्य देण्याचे नाकारले तेव्हा पांडव केवळ पाच गावे स्वीकारून संधी करण्यास तयार झाले होते. तरीही प्रथमपासूनच नाना प्रकारची कारस्थाने रचून पांडवांना संपवून त्यांचे सर्वस्व हिरावून घेण्याची इच्छा करणाऱ्या दुर्योधनाने संधी वा तडजोड होऊ दिली नाही. तेव्हा नाईलाजाने पांडवांना युद्धास सामोरे जावे लागले व त्यात दोन्ही पक्षाकडील लोक मारले गेले. आणि म्हणूनच कुरुक्षेत्रावरील नरसंहारास केवळ दुर्योधनच जबाबदार आहे. हस्तिनापूरचा राजा असूनही धृतराष्ट्राने दुष्ट व दुराग्रही दुर्योधनास अटकाव न केल्याने धृतराष्ट्रही कुरुक्षेत्रावर झालेल्या नरसंहारास जबाबदार आहे. श्री. सोवनी म्हणतात त्याप्रमाणे अर्जुनास कुरुक्षेत्रावरील हत्येस जबाबदार धरता येणार नाही.

'गीतेकडे सावधपणे बघितल्यास तिच्यात अनेक विसंगती दिसून येतात' असे सांगून लोकांच्या मनात गीतेविषयी श्रद्धा व भीतीयुक्त आदर निर्माण व्हावा म्हणून वापरलेल्या 'पंचतंत्रा'चा श्री. सोवनी यांनी उल्लेख केला आहे. याच पाच तंत्रांचा उपयोग करून स्वतः श्री. सोवनी यांनी स्वतःच्या पुस्तकाविषयी आदरयुक्त भीती व श्रद्धा निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. (पुस्तक लिहिलेले नसल्यास लिहावे.) त्यात त्यांना निश्चित यश येईल. परंतु असे करत असताना हेही लक्षात ठेवावे की, आपण काहींना काही वेळेस फसवू शकतो, परंतु सर्वांना सदैव फसवणे अशक्य आहे. आज जवळजवळ पाच हजार वर्षे श्रीमद्भगवद्गीता भारतीयांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करत आहे. तसेच भारतीय आणि परदेशातील विद्वान या ग्रंथाकडे आकर्षित झाले आहेत.

'दैवी सामर्थ्य श्रीकृष्णाजवळ असता गीतापदेश अर्जुनाला करून भारतीय युद्धाचा पसारा मांडण्याऐवजी फक्त दुर्योधन, दुःशासन, शकुनी, धृतराष्ट्र, कर्ण वगैरेंनाच काय तो उपदेश करून वा विश्वरूपदर्शन वगैरे घडवून हृदयपरिवर्तन

करणे पुरेसे नव्हते काय ?' या प्रश्नावरून असे वाटते की श्री. सोहनी यांनी मूळ महाभारत वाचले नसावे. गीतेचे तत्त्वज्ञान समजण्यासाठी तरी महाभारत वाचण्याची आवश्यकता आहे. धृतराष्ट्र व दुर्योधनास भीष्म, द्रोण व विदुर यांनी जसे समजावले आहे तसे श्रीकृष्णानेही समजावले आहे. तसेच त्यास युद्धापासून परावृत्त करण्यासाठी व संधी करण्यासाठी गेलेल्या कृष्णासच पकडण्याची तो जेव्हा भाषा करतो तेव्हा श्रीकृष्णाने धृतराष्ट्र व दुर्योधन या दोघांनाही विश्वरूप दाखवून त्यांना तडजोड स्वीकारून युद्ध टाळण्याची अंतिम संधी दिली आहे. (महाभारत, उद्योगपर्व , अध्याय १३१) तरीही तीक्ष्ण सुईच्या टोकावर मावेल इतकीही भूमी मी (केवळ पांच गावे मागणाऱ्या) पांडवांना देणार नाही असे दुर्योधन उद्धटपणे जाहीर करतो व दुर्योधनास राजा या नात्याने धृतराष्ट्रही अडवत नाही व पांडवांना युद्धास सामोरे जावे लागते. आणि म्हणूनच महाभारतीय युद्ध दुर्योधनाच्या दुराग्रहाने झालेले आहे. त्यास श्रीकृष्णाने समजावले आहे व विश्वरूपही दाखवले आहे.

'लाखो निरपराध लोकांना युद्धात लोटण्याऐवजी सरळ सुदर्शन चक्राने दुर्योधन, दुःशासनादी निवडक दुर्जनांना यमसदनी पाठवावयाचे होते' असेही सोवनी यांचे म्हणणे आहे. परंतु श्रीकृष्णाने धृतराष्ट्र व दुर्योधनास जे समजावले आहे ते कौरवांकडून युद्ध करणाऱ्या सर्वांना समजले आहे. कर्णास तर त्याने आपल्या रथात बसवून घेतले, त्यास दुर्योधनाच्या पक्ष सोडण्याचा आग्रह केला आहे, तरीही तो दुर्योधनाच्याच बाजूने लढतो व मरतो. दुर्योधनाचा पक्ष अधर्माचा आहे असे समजल्यानंतरही कर्णाप्रमाणेच अनेक वीर दुर्योधनाच्या बाजूने युद्ध करतात. विशेष म्हणजे यापैकी कोणीही दुर्योधनास युद्धाचे दुष्परिणाम समजावून सांगून त्याचा युद्धाविषयीचा दुराग्रह सोडावयास सांगत नाहीत. 'पाच गांवे देऊन पांडवांशी संधी कर, अन्यथा सर्वांचा संहार होईल व असे तू करत नसशील तर आम्ही तुझ्याबाजूने युद्ध करणार नाही' असेही त्यांच्यापैकी एकानेही बजावलेले नाही. आणि म्हणूनच 'समोर युद्धार्थ आलेल्यांशी युद्ध' या न्यायाने पांडवांनी त्यांच्याशी युद्ध केल्याने कौरव पक्षाकडील वीर युद्धात मारले गेले. त्यामुळे कौरवांकडील वीरांच्या मृत्युस श्रीकृष्ण व पांडवांपेक्षाही धृतराष्ट्र, दुर्योधन व ते स्वतःही जबाबदार आहेत. माझा पक्ष जर योग्य वाटत असेल तर माझ्या पक्षास येऊन मिळावे' असे युधिष्ठिराने युद्धारंभी कौरव पक्षाकडील वीरांना आवाहान

केले होते. यास फक्त धृतराष्ट्रपुत्र युयुत्सुने प्रतिसाद दिला व तो पांडवांना येऊन मिळतो व तो या युद्धातून वाचला आहे.

'त्याकाळी सर्व लोक असे संस्कृत श्लोकातच बोलत असत काय ? नसल्यास ते आणखी कुणीतरी रचले हे उघड आहे. असे असेल तर श्लोक रचणाऱ्याने मग मूळात श्रीकृष्णाने अर्जुनाला न सांगितलेल्या गोष्टीही गीतेत घातल्याची शक्यता नाकारता येणार नाही.' असे श्री. सोवनी यांचे म्हणणे आहे. महाभारतकाळात संस्कृत ही बोलीभाषा होती. लोक संस्कृतमध्ये बोलत. त्यामुळे श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता संस्कृतमध्ये सांगितली. व्यासाच्या कृपाप्रसादाने मी हे ज्ञान साक्षात् श्रीकृष्णाच्या मुखातून ऐकले आहे असे गीतेच्या शेवटी संजयाचे विधान आहे. (गीता, अध्याय १८, श्लोक -७५) त्यामुळे हे श्लोक व श्लोकांतील शब्दही श्रीकृष्णाचेच आहेत. स्वतंत्र भारताचे अर्थमंत्री, व रिझर्व्ह बँकचे गव्हर्नर आणि भारताचे थोर सुपुत्र श्री. सी. डी. देशमुख यांनी परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे संस्कृत श्लोकांतून लिहिल्याचे सर्वश्रुत आहे. लोकसभेत बोलताना सुद्धा ते तिथल्या तेथे संस्कृत श्लोक रचत व प्रश्नांची उत्तरे देते. यावरून श्रीकृष्णासारख्या आत्यंतिक बुद्धिमान युगपुरुषाने संस्कृत श्लोकांमधून अर्जुनास गीता सांगितल्याचे (व विशेषतः त्यावेळेस संस्कृत ही बोलीभाषा असताना) श्री. सोवनी यांना आश्चर्य का वाटावे ?

'जयद्रथ व कर्ण यांना अर्जुनाने कपटाने मारले' असे श्री. सोवनी म्हणतात. हे दोघे व भगदत्तही दुर्योधनाच्या बाजूने पांडवांशी युद्ध करण्यासाठी आले होते. जयद्रथाने व कर्णानेही महाभारतायुद्धापूर्वी पांडवांचे अनेक अपराध केले आहेत. व त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल पांडवानी त्यांना क्षमा केली आहे. तरी हे दुर्योधनाच्या वतीने युद्धार्थ आले असता अर्जुनाकडून ते मारले गेले यास अर्जुन जबाबदार नसून त्यांचीच दुष्कृत्ये जबाबदार आहेत.(जयद्रथ व कर्णाची अनेक दुष्कृत्ये सांगता येतील. परंतु लेखाच्या विस्तारभयास्तव ते शक्य नाही.)

अर्जुनाला फक्त ''ऊठ आणि युद्धाला लाग'' असे मोजक्या शब्दात न सांगता त्यास स्थितप्रज्ञाची लक्षणे, पुनर्जन्म, भक्ती, यज्ञ, दैवी व आसुरी संपत्ती इ. गोष्टी का सांगितल्या असे विचारून ते विश्वरूपदर्शनास 'संमोहनाचा प्रयोग' ठरवतात. तसेच ''हिंसा करण्यास आवश्यक असल्यास तूच कर. मी ती करणार नाही.'' असे सांगून अर्जुन युद्धनिवृत्त होऊन संन्यस्त होता तर त्यात वावगे काय

होते ?' असाही प्रश्न ते विचारतात. युद्धासाठी फार तर ''मन शांत ठेवून युद्ध कर'' एवढेच सांगणे पुरेसे होते. अर्जुनाला ठाऊक नसलेली दोन चार अस्त्रे शिकविणे त्यावेळी जास्त योग्य नव्हते काय ? तसेच कुठे बुद्धी, समत्त्ववृत्ती असा मार्ग, कुठे कर्म, योग असा मार्ग तर कुठे माझी भक्ती कर, मला शरण जा वगैरे उपदेश अशा विसंगती आढळतात. त्यांचे कारण काय ? अर्जुनाला नेमकी कोणती मात्रा लागू पडेल एवढेही श्रीकृष्णास ठाऊक नव्हते की काय ? आणि 'अध्यायामागून अध्यायात शेकडो श्लोकांमध्ये युद्धाशी संबंध नसलेल्या भलत्याच माहितीवजा कल्पनांचे भारूड गीतेत आढळते. (अधूनमधून कुठेकुठे 'म्हणून उठ आणि युद्धाला लाग' असेही पालुपद घातलेले दिसते.) शेवटी कशानेच बधत नाही असे बघून घाईघाईने 'विश्वरूपदर्शना'चा यशस्वी प्रयोग करण्यात येतो. त्यानंतर मात्र एकदम अर्जुनाचे हृदयपरिवर्तन होऊन तो, युद्धाला तयार होतो.' श्री. सोवनी यांचे हे सर्व प्रश्न व विधाने इतकी वरवरची वाटतात की यावरून त्यांनी संपूर्ण गीता सलगपणे वाचली असावी असे वाटत नाही. त्यांना गीतेमध्ये सर्वत्र फाफटपसारा व विसंगतीचेच दर्शन होते. वर उल्लेखिलेल्या त्यांच्या लेखातील प्रश्नांचे, विधानांचे व इतर शंका-कुशकांचे सविस्तरपणे उत्तर देण्याचा प्रयत्न केला तर त्यासाठी 'परामर्श'चा स्वतंत्र अंकच काढावा लागेल ! (आणि हे शक्य नाही.) लोकमान्य टिळकांनी हे काम अगोदरच केलेले आहे. 'गीतारहस्या' मध्ये टिळकांनी गीतेच्या अठरा अध्यायात आलेल्या सर्वच विषयांची संगती 'गीताध्यायसंगति' या चौदाव्या प्रकरणामध्ये फारच सविस्तरपणे समजावून सांगितली आहे. तेव्हा मी श्री. सोवनी यांना गीतारहस्यातील हे प्रकरण सूक्ष्मपणे वाचण्याची सूचना करतो. यातून त्यांना गीतेत आढळणाऱ्या पुष्कळशा विसंगती दूर होतील व गीतेत फाफटपसारा नसल्याचेही त्यांच्या ध्यानात येईल.

'विश्वरूपदर्शना'चा शेवटचा पर्याय म्हणून श्रीकृष्णाने उपयोग केला नाही. वास्तविकतः 'विश्वरूपदर्शन' करविण्याअगोदर अर्जुनाचा मोह नष्ट झाला होता हे अर्जुनाच्या अकराव्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकावरूनच स्पष्ट होते. (यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम।) वस्तुस्थिती अशी आहे की, अर्जुनाने 'विश्वरूप' बघण्याची इच्छा श्रीकृष्णाकडे प्रदर्शित केली व अर्जुनावरील प्रेमाने त्याने अर्जुनाची इच्छा पूर्ण केली व ते बघण्यासाठी दिव्यदृष्टीही दिली.

लेखाच्या शेवटी श्री सोवनी गीतेतील 'समत्ववृत्ती' विषयीचा विचार

स्वीकारतात, परंतु यासाठी त्यांना ईश्वर, कुणाला शरण जाण्याची, श्रद्धेची, कर्मकांडाची, भक्तीची, आत्मा-परमात्मा, पाप-पुण्य, पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त इ. गोष्टी स्वीकारण्याची गरज वाटत नाही. 'समत्ववृत्ती' स्पष्ट करताना ते म्हणतात, ''समत्व म्हणजे योग. योग म्हणजे (आत्म्याचे परमात्म्याशी मिलन नव्हे.) स्वतःतील विविध वृत्तींमधील एकोपा, सुसंवादित्व, संगीत. असे सुसंवादित्व समत्ववृत्तीतून उपजते. समत्ववृत्ती म्हणजे बाह्य घटना तसेच (स्वतःच्या कृती, विचार, भावना, इच्छा वगैरे) आंतरिक घडामोडीकडे निवडरहित जागरूकतेने, साक्षीभावाने, (हे चांगले ते वाईट, लाभहानी, उच्चनीच, हवेनको अशा द्वैतात विभागणी न करता) बघण्याची वृत्ती.'' (परामर्श पान नं. ३४)

श्रीकृष्णामध्ये श्री. सोवनी म्हणतात त्या अर्थाने समत्ववृत्ती विकसित झालेली दिसून येते. व त्यांनी हे मान्यही केले आहे. ते म्हणतात, 'वस्तुतः श्रीकृष्णाचे अवघे जीवन हे नृत्य-संगीत-आनंद-उत्सव-कर्तव्य-प्रेम-योग-ध्यान-समत्ववृत्ती-पराक्रम-तेज-ऐश्वर्य यांनी परिपूर्ण असे असल्याने त्याला 'पूर्ण पुरुष' अशी सार्थ उपाधी लाभलेली आहे. असा पूर्णपुरुष श्रीकृष्ण 'भाग्यवान' व 'परम ऐश्वर्यवान' ठरल्यास नवल नाही.' (परामर्श पान नं. २८) याचा अर्थ श्रीकृष्णामध्ये समत्ववृत्तीचा विकास झाल्याचे मान्य करावयाचे व ज्या मार्गाने ती वृत्ती विकसित झाली तो मार्ग नाकारायचा ! श्रीकृष्णाने ईश्वर, आत्मा, परमात्मा, श्रद्धा, पाप-पुण्य, पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त, मोक्ष या सर्व गोष्टी स्वीकारून ईश्वरभक्ती व विशेषतः 'निष्काम कर्मयोगा'चे आचरण केले आहे व यातूनच श्रीकृष्णामध्ये समत्ववृत्तीचा विकास झालेला दिसून येतो.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने श्रीमद्भगवद्गीतेतील सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजे 'निष्काम कर्मयोगी' होय. 'निष्काम कर्मा'विषयी श्री. सोवनी यांनी भलत्याच शंका-कुशंका उपस्थित करून ही संकल्पना समजण्यास फारच अवघड करून टाकली आहे. याउलट लोकमान्य टिळकांनी गीतारहस्यामध्ये 'निष्काम कर्मा'योगाचे तत्त्वज्ञान इतके सोपे करून सांगितले आहे की सर्वसामान्यांनाही सहज समजते. 'निष्काम कर्मयोग' थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल-

१. दररोजचे कर्म कर्तव्यभावनेतून करावे.

२. कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे केव्हाही चांगले असते.

३. कर्म (वर्तन या अर्थाने) टाळणे शक्य नाही.

४. कर्म योग्य रीतीने करावे.

५. त्यात कुठलीही कसर ठेवू नये.

६. सर्वशक्ती एकवटून कर्म करावे.

७. आज ना उद्या चांगल्या कर्माचे फळ चांगले तर वाईट कर्माचे फळ वाईट मिळते या विश्वासातून कर्म करावे.

८. कर्माचे फळ चांगले मिळाले तर मनुष्यास कर्म करण्याचा उत्साह राहतो, परंतु कर्म करूनही अपयश आले तर मनुष्य कर्म करण्याचे सोडून देतो.

९. सर्वशक्ती एकवटून दुसरा मनुष्य जे जे व जितके करू शकतो ते ते सर्वही मी केले आहे आणि म्हणून आलेल्या अपयशास मी जबाबदार नाही. (कर्माच्या अपयशास जबाबदार असणाऱ्या इतर घटकांवर आपले नियंत्रण नसते.)

१०. अशा स्थितीत आपली मर्यादा लक्षात आल्याने 'ईश्वरार्पण' बुद्धीने कठोर कर्तव्यनिष्ठेतून कर्म केल्यास येणाऱ्या अपयशाने माणूस खचून जात नाही व तो निरपेक्षपणे कर्म करू शकतो.

११. अशा प्रकारच्या 'निष्काम कर्म' योगाच्या आचरणातून माणसामध्ये 'समत्ववृत्ती' विकसित होते. श्रीकृष्णाने निष्काम कर्मयोगाचेच जीवनभर आचरण केले आहे. आणि म्हणूनच गीतेतील 'समत्ववृत्ती'चा विचार स्वीकारणाऱ्या श्री. सोवनी यांना श्रीकृष्णामध्ये 'समत्ववृत्ती'चा विकास कसा झाला हे जाणून घेण्यासाठी मी त्यांना हरिवंश, महाभारत व भागवत या तीन ग्रंथांमध्ये वर्णिलेले श्रीकृष्णाचे चरित्र बारकाईने अभ्यासण्याची विनंती करून माझी त्यांच्या लेखावरील प्रतिक्रिया संपवितो.

के. वि. पेंढरकर कॉलेज, रा. शं. खालकर
डोंबिवली (पूर्व) ४२१२०३

## संदर्भग्रंथ

१. श्रीमद्भगवद्गीतारहस्य - लोकमान्य टिळक
२. गीता-प्रवचने - श्री. विनोबा भावे.
३. गीतामृतम् - प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले.

ঔঔঔ